


# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)

Headlines: १३ ते २० जानेवारी २०२०

२१ जानेवारी २०२०

# हेडलाईन्स

## मनिलाजवळ ज्वालामुखीचा उद्रेक

- फिलिपाइन्सची राजधानी मनिला जवळ 'माउंट ताल' या ज्वालामुखीचा उद्रेक झाला आहे
- ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे शंभर किलोमीटर अंतरापर्यंतचे क्षेत्र प्रभावित झाले आहे.

**फिलिपाइन्सविषयी :**

- भौगोलिक स्थान : आग्नेय आशिया
- फिलिपाइन्स हा लुझॉन, विसायस व मिंदानाओ ह्या तीन भौगोलिक प्रदेशांत विभागला गेला आहे.
- राजधानी : मनिला
- क्षेत्रफळ : सुमारे तीन लाख चौ.कि.मी.
- लोकसंख्या : सुमारे दहा कोटी.
- भाषा : फिलिपिनो, टागालोग, इंग्लिश
- स्वातंत्र्य दिन : 12 जून 1898
- प्रशांत महासागरातील जवळपास सात हजार बेटांचा या देशाच्या भौगोलिक क्षेत्रात समावेश होतो.

**ज्वालामुखी :**

- भूगर्भातील तप्त शिलारस, बाष्प, वायुरूप - घनरूप पदार्थ ज्या प्रक्रियेमुळे भूपृष्ठावर उद्रेकाच्या स्वरूपात बाहेर फेकले जातात त्यास ज्वालामुखी म्हणतात.

**उद्रेकातून बाहेर पडणारे पदार्थ :**

- शिलारस, वायू, बाष्प, हायड्रोक्लोरिक ॲसिड, सल्फर डाय ऑक्साईड, हायड्रोजन व कार्बनडाय ऑक्साइड.
- शिलारसात असणारे घटक : सिलिका, लोह, मॅग्नेशियम.

**ज्वालामुखी उद्रेकाला कारणीभूत घटक**

1. भूगर्भातील अत्याधिक तापमान
2. अधिक दाब
3. वायूचे प्रसरण
4. भूगर्भातील रासायनिक पदार्थांची विविधता

**ज्वालामुखींचे उद्रेकाचे विशिष्ट केंद्रानुसार वर्गीकरण**

1. हवाईयन ज्वालामुखी : यातील उद्रेक फारसे स्फोटक नसतात. शिलारस पातळ असतो.

2. स्ट्रॅम्बोलीयन ज्वालामुखी : यातून अल्कधर्मी प्रकारचा शिलारस बाहेर पडतो व यात वायूंचे प्रमाण जास्त असते. उदा. भूमध्यसागरातील सिसिली बेट ज्वालामुखी.

3. वोल्कॅनियन ज्वालामुखी : शिलारस घट्ट असतो. उदा. स्ट्रॅम्बोली जवळील लिपारी बेट ज्वालामुखी.

4. पिलीयन ज्वालामुखी : ज्वालामुखी अत्यंत स्फोटक असतात. उदा . पिली येथील ज्वालामुखी

**ज्वालामुखीच्या उद्रेक कालावधीनुसार तीन प्रकार पडतात**

1) जागृत ज्वालामुखी - स्फोट वारंवार होतात.

2) निद्रिस्त ज्वालामुखी - ज्यांचे स्फोट व्हायचे थांबले आहेत परंतु होण्याची शक्यता आहे असे.

3) मृत ज्वालामुखी - यांचे स्फोट होण्याचे कायमचे थांबलेले असते.

**जगातील प्रमुख ज्वालामुखी**

1. स्ट्रॅम्बोली : इटली, भूमध्यसागर
2. असामा : जपान
3. विल्लाटिका : चिली
4. ऐरेबस : अंटार्क्टिका
5. कोटोपाक्सी : इक्वेडोर
6. माऊंट ताल : फिलिपाइन्स
7. माउंट एटना : सिसली (इटली)
8. माउंट पोपा : म्यानमार
9. फ्युजियामा : जपान
10. किलीमांजरो : टांझानिया
11. देवबंद : इराण

- भारतातील एकमेव जागृत ज्वालामुखीचे उदाहरण : बॅरन बेट, अंदमान निकोबार द्वीपसमूह.

## होर्मूझ पीस इनिशिएटिव्हमध्ये भारत सहभागी

- तेहरानमध्ये आयोजित करण्यात आलेल्या होर्मूझपीस इनिशिएटिव्हमध्ये भारताने हजेरी लावली. भारतासह चीन, ओमान, अफगाणिस्तान या इराणच्या महत्त्वपूर्ण व्यापारी भागीदारांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.
- अमेरिका-इराणच्या वाढत्या तणावामुळे पर्शियन आखातामध्ये वाढणाऱ्या तणावावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.
- जगातील सर्वात व्यस्त सागरी वाहतूक असणाऱ्या होर्मूझच्या सामुद्रधुनीमध्ये स्थैर्य निर्माण करण्याच्या

उद्देशाने हे उपक्रम आयोजित करण्यात आले.

- सप्टेंबर 2019 मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या बैठकीत इराणने 'Hormuz Peace Endeavor' चा प्रस्ताव मांडला होता. इराणने मांडलेल्या या प्रस्तावाचा आढावा या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या देशांनी घेतला.

**होर्मूझची सामुद्रधुनी :**

- ही आशियाच्या मध्य-पूर्व भागातील इराणच्या आखाताला ओमानच्या आखातासोबत जोडणारी एक अरुंद सामुद्रधुनी आहे.
- तिच्या उत्तरेस इराण तर दक्षिणेस संयुक्त अरब आमिराती व ओमान हे देश आहेत.
- जगातील एकूण खनिज तेल व LNG वाहतुकीच्या एक तृतीयांश वाहतूक याच सामुद्रधूनी मार्गे होते. दररोज सुमारे 18 दशलक्ष बॅरल खनिज तेल या मार्गाने वाहून नेले जाते.
- भारताच्या एकूण LNG वाहतुकीच्या निम्मी वाहतूक व खनिज तेल वाहतुकीच्या एक-तृतीयांश वाहतूक या सामुद्रधुनी मार्गे केली जाते.
- या सामुद्रधुनीच्या इराणजवळील स्थानामुळे अनेकदा अमेरिका व इराणमध्ये तणाव निर्माण झाले आहेत.
- इराणच्या आखाताला अरबी समुद्र व हिंदी महासागरासोबत जोडणारा हा एकमेव दुवा असून ही सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाच्या व मोक्याच्या सागरी स्थानकापैकी आहे त्यामुळे या क्षेत्रात शांतता व स्थैर्य राखणे आवश्यक आहे.

## WHO ची जागतिक आरोग्यासंबंधी आव्हानांची यादी

- जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांच्याकडून येणाऱ्या दशकात जग ज्या आव्हानांना तोंड देणार आहे, अश्या तातडीच्या 13 आरोग्यासंबंधी आव्हानांची एक यादी जाहीर करण्यात आली आहे.
- या अहवालात हवामानबदल आणि आरोग्य सेवांमधली असमानता अशा अनेक विषयांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आव्हाने पुढीलप्रमाणे :**

1. हवामानविषयक संकट
2. संघर्ष आणि संकटात सापडलेल्या प्रदेशांमध्ये आरोग्य सेवा पुरविणे.
3. आरोग्य सेवांमधली असमानता
4. उपचारांची उपलब्धता
5. संसर्गजन्य रोग प्रतिबंधक
6. साथीच्या रोगांसाठी तयारी
7. असुरक्षित उत्पादने
8. आरोग्य कर्मचाऱ्यांमधली अल्प गुंतवणूक
9. पौगंडावस्थेमधली सुरक्षा
10. आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांचा नागरिकांमधला विश्वास वाढविणे.
11. तांत्रिक प्रगतीचे भांडवलीकरण
12. प्रतिजैविकांना आणि इतर औषधांना होणाऱ्या प्रतिरोधाचा धोका
13. आरोग्य सेवेमधली स्वच्छता

**या अहवालानुसार :**

- हवामानातल्या बदलांमुळे सुमारे 7 दशलक्ष लोक नकारात्मकदृष्ट्या प्रभावित झाले आहेत.
- तसेच इतर धोक्यांमध्ये इन्फ्लुएंझा आजाराचा उद्रेक आणि HIV, मलेरिया आणि क्षयरोग सारख्या संक्रामक रोगांचा प्रसार हेही समाविष्ट आहेत.
- तसेच घात, हृदयविकाराचा झटका, श्वसनाचे रोग आणि फुफ्फुसाचा कर्करोग या आजारांमुळे जागतिक मृत्युंपैकी एका चतुर्थांशापेक्षा जास्त मृत्यू होतात. वायू प्रदूषणाची पातळी वाढल्यामुळे या रोगांची शक्यता वाढते.

**WHO बद्दल**

- जागतिक आरोग्य संघटना (WHO) ही आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य संबंधित संयुक्त राष्ट्रसंघाची एक विशेष संघटना आहे.
- स्थापना : 7 एप्रिल 1948
- मुख्यालय : जिनिव्हा (स्वित्झर्लंड)
- हा संयुक्त राष्ट्रसंघ विकास गटाचा एक सदस्य आहे.
- ही आरोग्य संघटना पूर्वी 'एजन्सी ऑफ द लीग ऑफ नेशन्स' म्हणून ओळखली जात होती.

## 93 वे मराठी साहित्य संमेलन 2020

- ठिकाण : उस्मानाबाद (मराठवाडा)
- अध्यक्ष : फ्रान्सिस दिब्रिटो (ज्येष्ठ साहित्यिक)
- स्वागताध्यक्ष : नितिन तावडे
- पत्रिकेवर गोरा कुंभार यांचे चित्र आणि अभंग
- कालावधी : 10 ते 12 जानेवारी 2020

**फादर दिब्रिटो यांचे साहित्य :**

- आनंदाचे अंतरंग, मदर तेरेसा, ओॲसिसच्या शोधात (प्रवासानुभव), तेजाची पाऊले (ललित), नाही मी एकला, संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची, इस्रायल व परिसराचा संघर्षमय इतिहास
- दिब्रिटो यांची ओळख पर्यावरणाचे रक्षणकर्ते, गुंडशाहीविरुद्ध आवाज उठविणारे कार्यकर्ते आणि सुजाण, सजग आणि सामाजिक भान असलेले व्यक्तिमत्त्व अशी आहे.
- 'सुवार्ता' या मासिकाद्वारे त्यांनी सामाजिक प्रबोधनाचे अनेक वेगवेगळे विषय मांडले आणि काही उपक्रमही राबवले.
- फ्रान्सिस दिब्रिटो हे ख्रिस्ती धर्मगुरू आहेत.
- दिब्रिटो 1983-2007 या कालखंडात सुवार्ता वृत्तपत्राचे मुख्य संपादक होते.

## मलाला यूसुफझाई सर्वात प्रसिद्ध किशोरवयीन

- पाकिस्तानच्या सामाजिक कार्यकर्त्या व नोबेल पारितोषिक विजेती मलाला यूसुफझाई यांना संयुक्त राष्ट्रांनी 'डिकेड ईन रिव्ह्यु' या अहवालात जगातील सर्वात प्रसिद्ध किशोरवयीन घोषित केले आहे.
- मलाला तिच्या महिलांच्या शिक्षणासाठी चालवलेल्या चळवळीसाठी प्रसिद्ध आहे. 12 जुलै 1997 रोजी जन्मलेली मलाला ही एक पाकिस्तानी विद्यार्थिनी, शिक्षण चळवळकर्ती आणि 2014 नोबेल शांतता पारितोषिक विजेती आहे.
- तालिबान या अतिरेकी संघटनांनी पाकिस्तानच्या वायव्य भागात मुलींच्या शिक्षणावर बंदी घातली होती. या बंदीविरुद्ध मलालाने लढा चालवला होता. तसेच या भागात महिलांच्या मानवी हक्कांची चाललेली पायमल्ली देखील तिने जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला.
- 2012 मध्ये शाळेत जात असताना तालिबानी अतिरेक्यांनी मलालावर तीन गोळ्या झाडल्या. गंभीर जखमी झालेली मलाला या हल्ल्यातून बचावली.
- या गंभीर हल्ल्यातून बचावलेल्या मलालाने स्त्री शिक्षणासाठी आपला लढा चालू ठेवला आहे.
- मलालाने मलाला फंड या ट्रस्टची स्थापना केली आहे. त्याद्वारे ती जगभरात शिक्षणाचा प्रसार करते.
- 'आय एम मलाला ' हे तिचे आत्मचरित्र आहे.
- 2014 मध्ये तिला नोबेल शांतता पारितोषिक भारताच्या कैलाश सत्यार्थीसोबत विभागून मिळाल्याचे घोषित करण्यात आले. नोबेल शांतता पारितोषिक जिंकणारी मलाला ही सर्वात तरुण व्यक्ती आहे.

## कोलकाता बंदराला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे नाव

- कोलकाता बंदराच्या 150 व्या वर्धापन दिनी झालेल्या सोहळ्यात या बंदराला जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे नाव देण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.
- या नामांतर कार्यक्रमाला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी उपस्थित राहिल्या नाहीत.
- 6 जुलै 1901 रोजी कोलकाता येथे जन्मलेले श्यामाप्रसाद मुखर्जी एक प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ राजकारणी व बॅरिस्टर होते.
- ते पंडित जवाहरलाल नेहरूंच्या सरकारमध्ये उद्योग व पुरवठा मंत्री होते. जम्मू-काश्मीरच्या मुद्द्यावरून पंडित नेहरूंशी झालेल्या मतभेदांमुळे ते राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून बाहेर पडले.
- 1951 मध्ये त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने भारतीय जनसंघाची स्थापना केली. ज्याचे रूपांतर पुढे भारतीय जनता पक्षामध्ये झाले.

## बाळासाहेब ठाकरेंच्या नावाने नवीन कृषी स्मार्ट योजना

- दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने महाराष्ट्र सरकारने नवीन कृषी योजना जाहीर केली आहे.
- शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र

राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठीचा एकूण निधी 2100 कोटी रुपये आहे. कृषी व कृषीपूरक व्यवसायांसाठी तसेच त्यांच्या विकासासाठी ही योजना आहे.

- या योजनेसाठी जागतिक बँक 1470 कोटी रुपयांचे कर्ज देईल. राज्य शासनाचा हिस्सा 560 कोटी रुपये असेल तर CSR फंडातून 70 कोटी रुपये देण्यात येतील.
- या योजनेअंतर्गत कृषी मालाच्या पणन व विपणन यावर विशेष भर देण्यात येणार आहे.
- यामध्ये शेतमाल बाजार प्रवेशाच्या नोंदी, प्रतवारी, गुणवत्ता तपासणी, संगणकीकृत शेतमाल लिलाव पद्धती, साठवणूक सुविधा, निर्यात सुविधा, निर्मिती, अस्तित्वातील सुधारणांचे आधुनिकीकरण, बळकटीकरण तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार समित्यांना ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म माध्यमातून एकीकृत बाजार नेटवर्कद्वारे जोडण्याची सुविधा, इत्यादी सुविधांचा समावेश आहे.
- या प्रकल्पाच्या माध्यमातून स्वयंसहायता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ, शेतकरी उत्पादक कंपन्या, साधारण स्वारस्य गट, शेतकरी स्वारस्य गट यांची स्थापना करण्यासह त्यांचे बळकटीकरण आणि कौशल्य विकास करण्यात येणार आहे.
- धान्य व फळे ,भाज्या बाजार समूहाची स्थापना केली जाणार आहे.

## ISRO ची यशस्वी कामगिरी

- ISRO (Indian Space Research Organisation) या भारतीय अवकाश संस्थेने यशस्वी कामगिरी पार पाडत GSAT-30 या दूरसंचार उपग्रहाचे दक्षिण अमेरिकेच्या कैरो बेटावरून यशस्वी प्रक्षेपण केले आहे.
- 17 जानेवारी 2020 रोजी पहाटे 2.35 वाजता उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले. या उपग्रहाच्या प्रक्षेपणामुळे इंटरनेट क्षेत्रात मोठी क्रांती होणार आहे, या नवीन पावलामुळे भारतातील इंटरनेटचे data speed वाढण्यास मदत होईल.
- GSAT 30 या उपग्रहाचे वजन सुमारे 3,357 किलो आहे. लाँचिंगपासून 15 वर्षे हा उपग्रह कार्यरत रहाणार आहे. या उपग्रहात 2 सोलर पॅनल आहेत. याला एलिप्टिकल ऑरबिटमध्ये स्थापित करण्यात आले आहे.
- यापूर्वी 2015 मध्ये इनसॅट-4 A हा उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला होता. त्याची कालमर्यादा आता संपुष्टात आली आहे. त्याला नवीन पर्याय व एक विकसित रूप म्हणून GSAT 30 हा उपग्रह लाँच करण्यात आला आहे.

**GSAT 30 : Geo Synchronous Satellite**

- हा संदेशवहन उपग्रह ISRO द्वारा तयार करण्यात आला आहे.
- प्रकार : communication
- कालावधी : 15 वर्षे
- वजन : सुमारे 3,357 KG
- Rocket used: Ariance 5 VCA VA251
- GSAT30 या उपग्रहामुळे मोठ्या तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रगती होणार आहे. V-SAT नेटवर्क व टेलिव्हिजन ॲप लिंकिंग, टेलिपोर्ट सेवा, डिजिटल उपग्रह, DSNG तसेच DTH टेलिव्हिजन सेवा आदी सेवांसाठी हा उपग्रह उपयोगी आहे.
- हवामानात होणाऱ्या बदलांची महितीसुद्धा या उपग्रहाद्वारे पुरवण्यात येणार आहे.

**भारत आणि ओमान नौदल सराव**

- भारत आणि ओमान यांच्यातला 'नसीम-अल-बहर' नावाचा 12 वा द्विपक्षीय नौदल सराव गोव्यात सुरू झाला.
- 'अल्-नजाह' हा भुदलाचा द्विपक्षीय सराव आहे.
- तर 'एक्स ईस्टर्न ब्रिज' हा हवाई दलाचा सराव आहे.

## 12 जानेवारी : राष्ट्रीय युवक दिन

- नरेंद्रनाथ दत्त उर्फ स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त 12 जानेवारी हा दिवस भारतात राष्ट्रीय युवक दिन म्हणून साजरा केला जातो.
- स्वामीजींच्या महान विचारांचा देशभरात प्रसार करणे, असा हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे.
- 1984 मध्ये भारत सरकारने 12 जानेवारी हा दिवस राष्ट्रीय युवक दिन म्हणून घोषित केला त्यानंतर 1985

पासून प्रतिवर्षी हा दिन राष्ट्रीय युवक दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.

- याप्रसंगी देशभरात सेमिनार, भाषणे, युवक वार्ता, निबंध लेखन, योगसत्रे इ. विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल:**

- स्वामी विवेकानंद यांचा जन्म 12 जानेवारी 1863 रोजी कलकत्ताच्या बंगाल प्रांतामध्ये झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त होते.
- त्यांना भारतात हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनाचे आणि राष्ट्रवादाचे जनक मानले जाते. 19 व्या शतकातील प्रसिद्ध संत रामकृष्ण परमहंस यांचे ते शिष्य होते.
- रामकृष्णांचा संदेश जनमानसांत पोहोचवण्यासाठी व सामाजिक सेवेसाठी 1 मे 1897 रोजी कोलकाता येथे स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मिशन सुरू केले.
- 1883 साली त्यांनी अमेरिकेतील शिकागोमध्ये आयोजित विश्व सर्वधर्म परिषदेमध्ये ऐतिहासिक भाषण केले आणि जगाला हिंदू धर्माचा परिचय करून दिला.
- राजा अजितसिंग खेत्री यांनी 1893 मध्ये स्वामीजींना 'विवेकानंद' असे नाव दिले.
- स्वामी विवेकानंद त्यांचे प्राचीन हिंदू तत्त्वज्ञान, अपर्याप्त तर्कशास्त्र आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे समायोजन करण्यासाठी ओळखले जातात.
- 4 जुलै 1902 रोजी त्यांनी कोलकत्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली.
- कन्याकुमारी येथे समुद्रात काही अंतरावर त्यांचे 'विवेकानंद स्मारक' आहे.

## 15 जानेवारी : भारतीय भूदल दिन

- भारतीय भूदलाचा स्थापना दिवस 15 जानेवारी हा भूदल दिन म्हणून पाळण्यात येतो. या वर्षीचा हा 72 वा भूदल दिन आहे.
- 15 जानेवारी 1949 रोजी के. एम. करिअप्पा यांनी ब्रिटिश सेनापती जनरल सर रॉय बुचर यांच्याकडून भारतीय भूदलाचे नेतृत्व स्वीकारले व ते भारतीय भूदलाचे कमांडर इन चीफ बनले. हाच दिवस भूदल दिन म्हणून साजरा करण्यात येतो.
- ते स्वतंत्र भारताचे प्रथम भूदल प्रमुख होते.

**भारतीय लष्कराविषयी :**

- 1776 : कोलकाता येथे ईस्ट इंडिया कंपनीचे भारतीय लष्कर खाते सुरू.
- 1 एप्रिल 1895 : ब्रिटिशांनी भारतीय लष्कराची स्थापना केली.
- जवानांची संख्या सुमारे 13 लाख 60 हजार. (संख्येबाबत जगात दुसरे स्थान)
- ब्रीदवाक्य : सर्विस फॉर सेल्फ
- सेनापती : जनरल मनोज मुकुंद नरवणे.
- नौदल दिन : 4 डिसेंबर.
- हवाईदल दिन : 8 ऑक्टोबर.
- चीफ ऑफ डीफेन्स स्टाफ (CDS) : बिपिन रावत.

## ठळक घडामोडी

- भारतात सर्वाधिक वेतन देणाऱ्यांमध्ये बेंगलोर प्रथम क्रमांकावर – रँण्डस्टॅण्डचा अहवाल.
- बहुचर्चित CAA कायदा भारतात लागू.
- जसप्रित बुमराहला पॉली उम्रीगर पुरस्कार
- रोहित शर्माला आयसीसीचा सर्वोत्तम क्रिकेटपटू पुरस्कार.
- विराट कोहलीला स्पिरिट ऑफ क्रिकेट पुरस्कार.
- भारताचे माजी क्रिकेटपटू बापू नाडकर्णी यांचे निधन.
- गोव्यात 'मोपा' या ठिकाणी नवे विमानतळ उभारण्यात येणार.
- मुंबईतील इंदू मिल या ठिकाणी होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची उंची 350 फूट होणार.
- मायकल पात्रा आरबीआय चे नवे डेप्युटी गव्हर्नर.
- शांघाय को-ऑपरेटिव्ह ऑर्गनायझेशनच्या जगातील आठ आश्चर्यांमध्ये स्टॅच्यू ऑफ युनिटीचा समावेश.
- परवेझ मुशर्रफ यांची फाशीची शिक्षा रद्द.
- 1 दिल्ली येथे रायसिना संवादास प्रारंभ.
- मेळघाट अभयारण्यातील हत्तींना दिला गेला कर्मचाऱ्यांचा दर्जा
- भारतात स्वदेशी बनावटीचे तेजस जहाजावर अरेस्टेड लँडिंग करणारे पहिले विमान.